# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

जा.क्र.584./शि.वि./२०१६ दि.17/03/२०१६

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व म.न.पा. प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय : महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शालेय मुलींच्या हस्ते ध्वजारोहण करण्याबाबत.**

**संदर्भ :** मा.शिक्षण सभापती यांचे दि.29.01.2016 चे समविषयाचे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस सुचित करण्यात येते की, म.न.पा. तर्फे **"बेटी बचाव, बेटी पढाओ"** ही योजना राबविण्यात येत असून त्याबाबत समाजात व नागरीकांमध्ये चांगल्या प्रतिक्रीया उमटत असून या योजनेला साकार करण्याकरीता महिला सशक्तीकरण व महिला आरक्षण योजनांना बळकटीकरण आणन्याकरीता म.न.पा. शाळेतील हुशार व होतकरु मुलींच्या हस्ते आगामी 15 ऑगस्ट, 2016 पासून ध्वजारोहण करण्याबाबतचे पत्र मा.सभापती, शिक्षण विभाग यांनी सादर केलेले असून याअन्वये कायद्याचे सल्लागार यांचे अभिमत प्राप्त झाले असून त्यांनी या संकल्पनेस सकारात्मक अभिप्राय दिला असल्याने आपणांस सुचित करण्यात येते की, आगामी स्वातंत्र्य दिनी 15 ऑगस्ट, 2016 ला आपल्या शाळेमधील उत्कृष्ट, हुशार व होतकरु असलेल्या मुलींच्या हस्ते ध्वजारोहण करावे. जेणेकरुन मुलींच्या सशक्तीकरणाबाबतचे प्रश्न प्रत्यक्ष अंमलात आणन्यात येत आहेत, हे निदर्शनास येईल.

ध्वजारोहण करीत असतांना याबाबतचे जे नियम ध्वजसंहितेमध्ये नेमुन दिलेले आहेत, त्याबाबत काटेकोर पालन करावे. ध्वजारोहण करीत असतांना कोणत्याही प्रकारे राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही व नियमांचा भंग होणार नाही, याची काळजी संबंधीत शाळांच्या मुख्याध्यापकांनी घ्यावी.

**(मा.अपर आयुक्त(I) यांचे दि.29.02.2016 चे मंजुरीन्वये)**

17/3/16

**उपायुक्त(I)**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी,**

1) मा.महापौर, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2) मा.शिक्षण सभापती, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.
3) मा.अपर आयुक्त(I), म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.
4) शिक्षणाधिकारी, म.न.पा., नागपूर यांना कार्यवाहीस्तव.